**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताच्या औषध निर्यात क्षेत्रानं ३० अब्ज डॉलर्सचा टप्पा केला पार.**
2. **आयआयटी- जेईई मुख्य प्रवेश परीक्षेच्या सत्र-२ मधे १०० पर्सेंटाईल मिळवणाऱ्यांमधे महाराष्ट्रातले ३ विद्यार्थी.**
3. **गडचिरोली पोलिसांनी केली चार जहाल नक्षल्यांना आज अटक.**
4. **44 पूर्णांक 2 अंश सेल्सिअससह अकोला जिल्हा विदर्भात सर्वात उष्ण, तर नागपुरात सलग दुसऱ्या दिवशी पारा 43 अंश सेल्सिअसवर.**

---

**औषध निर्यात**

**आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताच्या औषध निर्यात क्षेत्रानं ३० अब्ज डॉलर्सचा टप्पा पार केला असून यापैकी एक तृतीयांश पेक्षा जास्त वाटा अमेरिकी बाजारपेठेचा आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या तुलनेत भारताच्या औषध निर्यातीनं ९ टक्क्यांहून जास्त वृद्धी नोंदवली असून, या काळात अमेरिकेत झालेल्या निर्यातीमध्ये १४ टक्के वाढ दिसून आली आहे. गेल्या आर्थिक वर्षात भारतातून सर्वाधिक औषध निर्यात झालेल्या देशांमध्ये युके, ब्राझील, फ्रान्स आणि दक्षिण आफ्रिकेचाही समावेश आहे.**

---

**यकृत दिन**

**२०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकारण्यासाठी प्रत्येकानं आपल्या आरोग्याची काळजी घ्यायला हवी, असं आवाहन केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी केलं आहे. यकृत दिनाचं महत्व सांगण्यासाठी आज नवी दिल्ली इथल्या यकृत आणि पित्त विज्ञान संस्थेत, आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. निरोगी यकृत हा निरोगी शरीराचा पाया असून प्रत्येकानं त्यादृष्टीने आहार आणि व्यायाम यावर लक्ष द्यावं, असं ते म्हणाले - शाह यांनी देशात तयार झालेल्या आरोग्य सोई सुविधांचा देखील आढावा घेतला-**

*2014 में देश में सात एम्स थे, आज 23 है। मेडिकल कॉलेज 387 थे, आज 780 है। एमबीबीएस की सीटें 2014 में 51 हजार थी, आज 1 लाख 18 हजार है, और 75,000 और बढ़ने जा रही है।और ये सब धन के बगैर नहीं होता है। 2014 में हमारा स्वास्थ्य का बजट 37 थाउजेंड करोड़ था। आज 1 लाख 27 हजार करोड़ रुपया है ।*

-------------------------------------

**जेईई मेन**

**एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं आज सकाळी 'जेईई मेन-२०२५' प्रवेश परीक्षेच्या सत्र-२ चे निकाल जाहीर केले. यंदा, एकूण २४ विद्यार्थ्यांनी जेईई मेन २०२५ पेपर एक मध्ये १०० पर्सेन्टाइल मिळवले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातल्या सानिध्य सराफ, आयुष चौधरी आणि विशद जैन या तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. परीक्षेचा निकाल कट-ऑफ यादीसह आता जेईई मेनच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे. एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या जेईई मेन पेपर एक च्या, सत्र दोन साठी एकूण ९ लाख ९२ हजार ३५० उमेदवारांनी परीक्षा दिली होती.**

-------------------------------------

**वेव्हज**

**वेव्हज अंतर्गत होणाऱ्या ॲनिमेशन चित्रपट निर्मात्यांच्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत एकूण ४२ कलाकृती असणार आहेत. एकूण ४१९ कलाकृती यात सहभागी झाल्या होत्या. ॲनिमेशन, व्हीएफएक्स आणि** virtual production **चा वापर करुन स्पर्धकांनी या कलाकृती बनवल्या आहेत. ९ महिन्यांच्या कालावधीत या कलाकृतींची छाननी करुन राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परीक्षकांनी ही निवड केली आहे. अंतिम फेरीतल्या सर्वांना आता १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हज परिषदेत त्यांचं काम सादर करता येईल.**

-------------------------------------

**भांडेवाडी आग**

**नागपूरच्या भांडेवाडी संकुलातील डंपिंग यार्डमध्ये आज दुपारी दोन ते अडीचच्या सुमारास भीषण आग लागल्याची माहिती आमच्या प्रतिनिधिने दिली. आग इतकी भीषण होती की त्याच्या ज्वाला अनेक किलोमीटर अंतरापर्यंत दिसत होत्या. अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, अग्निशमन दलाच्या आठ गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात**

आल्या आहेत. आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करण्यात येत असून, आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

---------------------------------------

**नक्षल्यांना अटक**

फेब्रुवारी महिन्यात गडचिरोली जिल्हयातील भामरागड तालुक्यातील दिरंगी-फुलणार जंगलात झालेल्या चकमकीत सहभागी असलेल्या चार जहाल नक्षल्यांना पोलिसांनी आज अटक केली. त्यात रघु आणि जैनी या दाम्पत्यासह झाशी तलांडे व मनिला गावडे यांचा समावेश आहे. रघु हा दक्षिण गडचिरोलीचा विभागीय समिती सदस्य होता. जैनी ही भामरागड दलमची विभागीय समिती सदस्य, झाशी तलांडी व मनिला गावडे या दोघी भामरागड दलमच्या सदस्या होत्या. चारही नक्षल्यांवर ४० लाख रुपयांचे बक्षीस होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

---------------------------------------

**सिटीझन फिडबॅक प्रणाली**

पोलिस स्टेशनमध्ये तक्रार अथवा पोलिस विभागाशी संबंधित कामाकरिता गेल्यानंतर त्यांच्या तक्रारीचे काय झाले? हे जाणून घेण्याकरिता गोंदिया जिल्हा पोलिस विभागाने सिटीझन फिडबॅक प्रणाली कार्यान्वित केली आहे. नागरिकांचा फिडबॅक जाणून घेत त्यावरून सुधारणा करून अधिक जलगतीने सेवा देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. या बद्दल पोलीस अधीक्षक गोंदिया गोरख भामरे यांनी माहिती दिली.

*नागरिक पोलीस स्टेशनला येतातं त्यांना नवा ग्रुप मिळते किंवा जे काही मदत मिळाली असेल किंवा एकंदरीत या पोलीस स्टेशन चा अनुभव कसा राहिला ह्या गोष्टीमुळे त्यांना बऱ्याच वेळा तक्रार करायची किंवा वरिष्ठांना माहिती सांगायची सोय नसते. त्यामुळे पोलीस स्टेशनला जे तक्रार द्यायला येतात त्यांना ते क्यू आर कोडं स्कॅन करून पोलिसांच्या मोबाईल वर एक सिम्पल फॉर्म येतो. त्यामध्ये चार पाच एन्ट्रीज असतात किंवा काही सूचना असतील काय लागतील ते फीडबॅक देत असते देऊ शकता पण तुम्ही डायरेक्ट्ली ते माझ्यापर्यंत येते त्यामुळे कोणाला काही अडचण असेल किंवा कोणाला काही योग्य मदत मिळालेली नसेल ते डिरेक्टली माझ्यापर्यंत येत माहिती आणि त्यांना मग आम्ही कॉन्टॅक्ट करून ती योग्य माहिती मदत करणारी लागतो.*

सर्व पोलीस विभागात सिटीजन फीडबॅक असलेला क्यूआर कोड स्कॅन करून नागरिक आता सरळ अधीक्षकांना आपला अभिप्राय देऊ शकणार आहेत.

-------------------------------------

हवामान

अकोला जिल्ह्यात सातत्याने कमाल तापमान 44 अंश सेल्सिअसच्या पलीकडे असून आज 44.2 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. अमरावती इथं 43.6, यवतमाळ इथं 43.4, नागपुर इथं 43 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. नागपुरात काल देखील 43 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. विदर्भाच्या उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील तापमान 40 ते 42 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाच्या अंदाजानुसार आज पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली या ठिकाणी मेघगर्जनेसह वादळ येण्याची शक्यता असून, पश्चिम विदर्भातील यवतमाळ इथं देखील वादळी पर्जन्यमान राहू शकतं.

-------------------------------------

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वतीने डॉक्टरेट (डी.एस्सी., डॉक्टर ऑफ सायन्स) प्रदान करण्यात आली. विद्यापीठाच्या वतीने आयोजित 26व्या दीक्षांत समारोहामध्ये काही अपरिहार्य कारणांमुळे गडकरी यांना उपस्थित राहता आले नव्हते. त्यामुळे आज परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. इंद्रमणी यांनी गडकरी यांच्या निवासस्थानी आयोजित अनौपचारिक सोहळ्यात ही डॉक्टरेट प्रदान केली.

-------------------------------------

गणेश नाईक

जंगलातील वनसंपदा वणवा लागून नष्ट होऊ नये, यासाठी इतर देशांमध्ये केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करून वणवा पेटू नये यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी ड्रोन, हेलिकॉप्टरसह इतर अत्याधुनिक यंत्रणाचा वापर करावा, असे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले आहेत. वनविभागातील योजना तसंच उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी महाबळेश्वर इथं आयोजित बैठकीत ते बोलत होते. वन विभागाच्या ज्या जमिनीवर झाडं उगवत नाहीत अशा जागांवर सोलर

पार्क उभारण्याचा राज्य शासनाचा मानस असून वन विभागातील सर्व रिक्त जागा भरण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

-------------------------------------

आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज संध्याकाळी ७.३० वाजता राजस्थान रॉयल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स मध्ये सामना होणार आहे.

-------------------------------------

पाणी टंचाई

पाणी टंचाईग्रस्त भागात उपाययोजना करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. राज्यातील अनेक भागातली पाणी टंचाई सोडवण्यासाठी आराखडा तयार केला जात असून उपाययोजनाही करत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. टंचाईग्रस्त जिल्ह्यांमध्ये संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना उपाययोजना करण्याचे आदेश यावेळी त्यांनी दिले.

-------------------------------------